# आर्थिक समावेशन
# आणि
# राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**Day 1 session 4**

# Survival Film
# (Please refer reading material)

# आर्थिक समावेशन समितीचे निष्कर्ष

- देशातील ९ कोटी शेतकरी कुटूंबापैकी ४.९ कोटी कुटूंबे म्हणजेच ५३ % शेतकरी कुटूंबाना अजुनही बॅका किंवा वित्त संस्थाकडून कर्ज पुरवठा होत नाही.
- बॅकांच्या ७५ हजार शाखा असुन सुद्धा अजुनही फक्त २७ % शेतकरी कुटूंबाना बॅकांकडून कर्ज पुरवठा होतो
- एकुण शेतकऱ्यांपैकी ६६ % शेतकरी अत्यल्प भुधारक आहेत आणि त्यापैकी फक्त २० % अत्यल्प भुधारकांना बॅकांकडून कर्ज पुरवठा होतो.
- ८० % भुमिहिन शेत मजुरांना अजुनही कोठुनही कर्ज पुरवठा होत नाही.
- ग्रामीण भागात १५ कोटी कुटूंबे आहेत त्यापैकी ६० % शेतकरी कुटूंबे आहेत.

**याचा अर्थ ५ कोटी कुटूंबांना कर्जाची गरजच नाही का?**

**का ते कर्ज मिळण्यापासुन वंचित आहेत?**


# आर्थिक समावेशन न झाल्यामुळे वगळलेल्या कुटूंबांची आकडेवारी

| प्रकार | समावेश असलेल्या कुटूंबांची टक्केवारी |
|---|---|
| • विमा | =१० % |
| • आर्थिक मालमत्ता कर्ज | =२ % |
| • मालमत्ता विमा | =३ % |
| • आरोग्य विमा | =०.२ % |
| • क्रेडिट कार्ड | =३ % |
| • डेबिट कार्ड | =६ % |
| • लहान ओव्हर ड्राफ्टस | =४ % |
| • उदयोजक कर्ज | =२ % |

# असे असेल तर



तीचे हक्क कोणी हिरावुन घेतले ?



काळे ठिपकेमोजा.

**आर्थिक समावेशनातुन वगळलेल्या कुटूंबांची संख्या मोजता येणार नाही**

# मग कोणी आर्थिक समावेशनातुन वगळले जात आहे काय?

**होय**

- लोकसख्येतील फार मोठा वर्ग
- त्यांच्या प्रगतीची / विकासाची गरज आहे.
- बँका आर्थिक संस्था त्यांना त्यांच्या हक्कापासुन दुर ठेवत आहेत.

**असे का?**

- त्यांची अविकसीत परिस्थिती
- परिस्थितीने गांजलेली स्थिती
- कमी बचत आणि कमी भांडवलाचे प्रमाण
- बाजार पेठेत उतरू न शकण्याची क्षमता
- अती गरिबी

# कष्टकरी स्त्रीचे चित्र



या गरिब महिलेला आपण
प्रगतीत सामावुन
घेऊ शकू का?



हा शेतमजुर आपला ग्राहक होऊ शकेल काय?



हा बलुतेदार आपला ग्राहक होऊ शकेल काय?

# भारतातील ग्रामीण कर्ज व्यवस्थेची रचना

भारतीय रिजर्व बँक

भारत सरकार

नाबार्ड

ग्रामीण सहकारी संस्था

| | सार्वजनिक बँका (२७) | खाजगी बँका (३१) | ग्रामीण क्षेत्रीय बँका (८८) |
|---|---|---|---|
| शाखा | ४६११८ | १०८१६ | १४४५६ |
| निम शहरी | १०९०३ | १७६१ | २०३७ |
| ग्रामीण | १९२७५ | ११३८ | १२०६० |
| टक्केवारी | ६५ % | २७ % | ९८ % |

| | |
|---|---|
| राज्य सह. भँका | – ३० |
| जिल्हा मध्य. सह. बँका | –३६७ |
| प्राथमिक कृषी सह. पतसंस्था | – १,१२,३०७ |
| भु विकास बँका | – २० |
| प्रा. भु विकास बॅका | –७३९ |

ठेवीधारक व कर्जदार

सुक्ष्म वित्त. संस्था

स्वयं सहाय्यता गट

# आर्थिक लाभांपासुन /सेवांपासुन वगळण्याचे परिणाम

- वाढणारी बेरोजगारी
- वाढणारी गुन्हेगारी

**सामाजिक असंतोषाचे परिणाम गंभीर /हिंसक असतात.**



# आर्थिक समावेशन – व्याख्या

- **आर्थिक समावेशन म्हणजे फार मोठया प्रमाणात असणाऱ्या गरिब व कमी उत्पन्न असणाऱ्या व सदयस्थितीत आर्थिक लाभांपासुन वंचित असलेल्या कुटूंबांना परवडेल अश्या किमतीत /मोबदल्यात सर्व बँकिंग सेवांचा / सुविधांचा लाभ देणे.**

- गरिब कुटूंबाचे बँकेत खाते नसते. रोजगार बुडवून लांब असलेल्या दुरच्या गावात बँकेत प्रवासाचा खर्च करून व वेळ खर्च करून वारंवार जाणे आणि बँकांच्या आवश्यक योजनांचा लाभ घेणे त्यांना शक्य नसते.
- तुटपुंज्या उत्पन्नातुन बचत करणे व त्यातुन बँकेत खाते उघडणे, आर्थिक नियोजन करणे त्यांना असक्य असते म्हणुन अश्या वंचितांना बँकेकडून कर्ज आणि इतर सुविधाही मिळत नाहीत.

# आर्थिक समावेशनात येणाऱ्या बाबी

- बँकेत “नो फ्रिल” खाते उघडणे.
- बँकेतुन जनरल क्रेडीट कार्ड, किसान क्रेडीट कार्ड मिळणे.
- समुदायांची खाते उघडणे व समुदायाला एकत्रित /वैयक्तिक कर्ज मिळणे. उदा. स्वयं सहाय्यता गट, शेतकरी मंडळ, फेडरेशन, जॉईंट लायाबिलीटी ग्रुपस इ.
- सावकारी कर्जापासुन मुक्तता
- लघु विमा
- आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सेवा उदा. स्वतःच्या गावात पैसे मिळणे, जमा करणे, पैसे पाठविणे इ.
- केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध ३४ योजनांचे पैसे लाभधारकाच्या/ वैयक्तिक बचत खात्यात जमा होणे.

# आर्थिक लाभातुन वगळण्याची कारणे

- डोंगराळ भागात, कमी वस्तीच्या वाडयांमध्ये राहणे व दळण वळणासाठी रस्ते साधने नसणे.
- गरिबी / कमी उत्पन्न
- सुविधांची माहिती नसणे.
- अशिक्षित असणे.
- सामाजिक बहिष्कृतता.
- बँकेच्या शाखेपासुन जास्त अंतर, शाखेच्या वेळा.
- बँकेच्या कर्जाच्या जाचक अटी आणि कागदपत्रे.
- बँकेच्या गरिबांसाठी अव्यवहार्य योजना.
- भाषेची अडचण, बँकेच्या कर्मचाऱ्यांची वागणुक.
- जास्त खर्च आणि किचकट कार्यपद्धती.

# आर्थिक लाभांपासुन कोण वंचित राहतात?

- लहान आणि अत्यल्प भुधारक शेतकरी
- भुमीहीन शेतमजुर, कुळ, तोंडी कराराने शेती कसणारे, वनपट्टा धारक
- आदिवासी, अनुसुचित जाती /जमाती
- असंघटीत क्षेत्रातील कामगार, कारागीर, मजुर
- स्वयंरोजगारी
- गलीच्छ वस्ती, झोपडपट्टी रहीवासी, निर्वासीत, भटक्या जमाती.
- अल्प संख्यांक, सामाजिक बहिष्कृत गट, पंथ
- जेष्ठ नागरिक, स्त्रीया, विदयार्थी
- अपंग


# वंचितांना कोणत्या सेवा, सुविधा पाहिजेत?

- छोटी कर्जे
- उत्पादक मालमत्ता
- बचतीची व तत्सम खाती
- आरोग्य विमा
- जिवन विमा
- व्यवसाय बंद पडल्यास विमा, कृषी विमा
- लघु उदयोग कर्ज
- क्रेडीट कार्ड
- निवृत्ती लाभ योजना
- तारण कर्ज, गहाण कर्ज
- आर्थिक मार्गदर्शन / सल्ला

# आर्थिक समावेशनाचे मॉडेल

- स्वयं सहाय्यता गट, संघ
- बॅक – मॉयक्रोफायनान्स इन्स्टिटयुशन
- जे.एल.जी.
- बिझिनेस फॅसिलीटेटर
- बिझिनेस करसपाँडंट
- नो फ्रिल खाते
- जनरल क्रेडिट कार्ड, किसान क्रेडिट कार्ड

# पर्याय =स्वयं सहाय्यता गट



# बिझिनेस फॅसीलिटेटर मॉडेल

**बॅका आर्थिक समावेशनासाठी खालील माध्यमे /मध्यस्थ वापरू शकतात.**

- स्वयंसेवी संस्था
- स्वयं सहाय्यता गट
- विमा एजंट
- ग्रामीण माहिती केंद्र
- शेतकरी  मंडळ
- सामाजीक संस्था
- कृषी व्यवसाय केंद्र
- कृषी विकास केंद्र /संशोधन केंद्र
- पोस्ट ऑफिस
- पंचायत
- दुकानदार
- भारत निर्माण सेवक
- निवृत शिक्षक, सरकारी कर्मचारी, बँकर

**बॅकेच्या सोयीनुसार गरजेनुसार निवड**

**रिझर्व बॅकेच्या मंजुरीची गरज नाही.**

# बिझिनेस करस्पाँडंट मॉडेल

- स्वयंसेवी संस्था आणि एम.एफ.आय.
- पोस्ट ऑफिस.
- आय.टी. मधील कॉरपोरेटस् आणि कंपन्या.

**बिझिनेस फॅसीलिटेटर प्रमाणेच सेवा अपेशित**

**महाराष्ट्रात सर्व बँकांसाठी हे काम वक्रांगी या कंपनीला दिले आहे**

# बायोमेट्रीक उपकरण



# के.वाय.सी. नियम आणि नो फ्रिल खाती

- बँकांनी सुलभ, सोपे, लवचीक नियम वापरावेत.
- ग्रामसेवक, सरपंच, स्वयंसेवी संस्थानी दिलेला रहिवासी दाखला व फोटो दाखला पुरेसा
- आधार क्रमांक पुरेसा
- खाते उघडताना शुन्य रकमेने खाते उघडणे.

# आर्थिक समावेशन धोरण आणि राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सुमारे ५ लाख स्वयं सहाय्यता गटांची स्थापना झाली आहे. यातील बहुतांश गटांना बॅकांकडून कर्ज पुरवठा झालेला नाही. आर्थिक समावेशन मध्ये बँकांचा सहभाग वाढविण्यासाठी खालील प्रमाणे कार्य वाही अपेक्षित आहे.

**अ) स्वयं सहाय्यता गटांची बँकेशी संलग्नता**

बँकांनी पंचसुत्रीच्या आधारावर श्रेणीकरण झालेल्या गटांना फिरता निधी आणि अर्थसहाय्य दयायचे आहे. हे कर्ज तीन प्रकारचे आहे

१. उत्पन्न वाढिचे व्यवसाय

२. सामाजिक गरजा उदा. घर, शिक्षण, लग्न, आजारीपणा इ.

३. सावकारी कर्जातुन मुक्त होण्यासाठी.

# आर्थिक साक्षरता आणि कर्ज मार्गदर्शन केंद्र

- आर्थिक समावेशन मध्ये बॅकांमध्ये बचत खाती उघडणे, कर्जाविषयी माहिती मिळणे, सावकारी कर्जातुन मुक्तता मिळण्यासाठी योग्य सल्ला मिळणे महत्वाचे आहे यासाठी प्रत्येक जिल्ह्यात अग्रणी बॅकेने **आर्थिक साक्षरता आणि कर्ज मार्गदर्शन केंद्र** सुरू करावे असे रिझर्व बॅकेने निर्देशित केले आहे.
- आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशी मार्गदर्शन केंद्रे सुरू झाली आहेत.
- थोडक्यात आर्थिक समावेशनचा एकच महत्वाचा उद्देश आहे तो म्हणजे

**“देशातील प्रत्येक कुटूंबापर्यत जाऊन पोहचणे”**

# लिंड इंडिया फिल्म


धन्यवाद!